। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १९३ वा । बुधवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू

RNI 47034/64

# लातूर समाचार

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## शेतकऱ्यासाठी वेगळ्या योजनेची गरज

राज्यात विशेष करून मराठवाड्यातील शेतकऱ्यावर पाणी संकट निर्माण झाले आहे. यावर मात करणे आवघड दिसून येत आहे. येन सणाच्याकाळात नैसर्गिक संकट निर्माण झाल्याने यावर मात केली जात आहे. संकट मोठे आहे, कारण शेतीतील आहे तेवढे धान म्हणजे पीक नष्ट झाले. उरले ते सोयाबिन तेही पाण्यात आहे. पाण्यात असल्याने मोड फुटल्याचे दिसून येत आहे. मराठवाड्यात सर्वाधिक पेरा हा सोयाबिनचा होता. दरवर्षी मोठ्या प्रमाणात सोयाबिन पेरले जात असते, हातीही लागते. यावर्षी तसे दिसून आले नाही. सर्व काही पावसाने धुऊन घेतले. त्यामुळे सतत काहींना-काही लहानमोठ्या प्रमाणात शेतकऱ्यावर संकटे येत आहेत. यावर कायम स्वरूपी मात करण्यासाठी उपायोजनांची गरज आहे. सरकार विमा योजना जाहिर केली. यामुळे थोडा आर्थिक हातभार लावणे आवश्यक आहे. निसगाचे संकट हे वेगळेच असते. निसर्गाच्या संकटापुढे काही वाचविता येईल असे नसते. अचानक आलेले संकट क्षणात होते तेवढे नष्ट होते. त्यामुळे नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी वेगळी बचाव यंत्रणा कार्यरत ठेवावी लागणार आहे. नैसर्गिक संकट मोठे असते ते सप्टेंबर महिण्यात मराठवाड्यावर कोसळले आहे. वास्तविक अनेक ज्योतिषी आहेत. भले-भले भाकित करणारे आहेत. भविष्यवाणी केली जाते ती सत्यात उतरली जाते असे असताना, त्याच प्रमाणे हवामान विभाग विज्ञानावर प्रगत आहे. हे सर्व बाबी म्हणा सर्वजनच फोल ठरले आहे. शेतकऱ्यावर एवढे मोठे संकट येईल. शेतकरी आर्थिकदृष्टया धुऊन जाईल असे कोणीही पुर्ण सुचना दिली नाही. सर्वाधिक नुकसान होईल असेही कोणी भाकित केले नाही. त्यामुळे ईश्वर मोठा आहे तो सर्व शक्तीमान आहे हे विसरता येऊ शकत नाही हे या संकटाने दाखऊन दिले आहे. शेतकरी हा पुर्णतः निसर्गावर आवलंबुन आहे. निसर्गाने साथ दिली तरच शेतीत उत्तम उत्पादन होते असे असताना यावर्षी उलट संकट निर्माण झाले. त्यामुळे आता निसर्गाने शहाणे केले आहे त्यानुसार अशा संकटावर कशाप्रकारे करावी लागेल यावर चिंतनाची गरज आहे. केवळ चिंतनच काय अशा संकटावर कशा प्रकारे मात करता येईल याचाही विचार करावा लागणार आहे. नैसर्गिक संकट मोठे आहे. असे जरी असले तरी शासनाने खारीचा वाटा उचलला पाहिजे. मदतीचा हात पुढे केला पाहिजे. मदत ही भरघोष न देता अतिषय कमी मदत दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सणावर याचा परिणाम दिसून आला आहे. जो दिवाळीच्या सणात उत्साह अपेक्षित होता तो दिसून येत नाही. चैनीच्या वस्तूखरेदीकडे पाठ फिरवली गेली. दिवाळीत जे मोठ्या आनंदाने फटाके फोडले जातात त्याचा आवाज मंदावला आहे. अनेक नवनवीन प्रतिष्ठाने उघडली जातात ते दिसून येत नाहीत. एकंदरीत शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढावले आहे, याचा परिणात दिसून आला. बाजारात पैसा सर्वाधिक खेळला जातो तो शेतकरी बांधवाकडून! शेतकऱ्यावर कमी संकट आले नसते तर दिवाळी थोड्याफार प्रमाणात आनंदात गेली असती. दिवाळीचा सण एकावर्षांनी येत असतो. नवनवीन खरेदी, अनेक गोडाधोडाचे पदार्थ बनविण्याची ही एक पर्वणी असते. दररोज तसे गोडधोड खात असतो, मात्र यावेळी दिवाळीच्या एक महीण्यात अगोदर संकटाची मालिका सुरु झाली ती थांबायाला तयार नाही. शेतकऱ्यांच्या हाती शेतीमाल लागला नाही. सर्व काही निसर्गाने धुऊन घेतले गेले. ही वस्तूस्थिती पाहाता सरकारने मदतीचा हात मोठ्या प्रमाणात पुढे करणे अपेक्षित होते. किमान आंनदाचा शिधा सारखे किट वाटणे अपेक्षित होते. काही सेवाभावीवृत्तीच्या समाजातील दानशुर व्यक्तींनी मदत दिली. कपडे वाटले. काही शालेतील विद्यार्थ्यांना स्कुलबॅगचे वाटप केले. काही ठिकाणी साड्या वाटप केल्या. लातूर जिल्ह्यात एकमेव उदा. म्हणजे औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी जाहिर कार्यक्रम घेऊन मदत केले. यावेळी काही दानशुर व्यक्तींना आवाहन करून सोबत घेतले व मदतीचा हात पुढे केला. मुळात आपल्याकडे भरपूर आहे मात्र दान देण्याची प्रवृत्ती अपेक्षित असावयास पाहिजे. ज्याला दानत म्हणतात, ती असली पाहिजे. केवळ घोषणा किंवा कोरडी तळमळ काही कामाची नाही. शेतकऱ्यास मदत मोठ्या प्रमाणात केली असती तर काही बिघडले नसते. हेच संकट निवडणुक पुर्व उद्भवले असते तर भरीव मदतीची रीघ लागली असती. निवडणुका झाल्या, सर्व काही झाले त्यामुळे का मदतीचा हात आकडता घेतला गेला? मुळात शेतकरी समाधानी, आनंदी असेल तरच राज्यात समाधानाचे चित्र दिसून येते नसता निराशजनक चित्र दिसून येते. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यावर संकट आल्यास त्यातुन कशा प्रकारे बाहेर काढता येईल या बाबत योजना तयार करावी. मोठे तज्ज्ञ असतात त्यांचा सहभाग घेऊन शेतकऱ्यावरील संकटावर मात करण्यासाठी योजना अपेक्षित आहे. एकदा का शेतकरी कोलमोडला तर पुन्हा उभारी घेऊ शकत नाही. याचा परिणाम राज्यात होवू शकतो. आर्थिक दृष्टया राज्य यदाकदाचित संकटात येऊ शकते. या बाबीचा विचार आता करावा लागणार आहे. अनेक योजना चांगल्या आहेत. तसेच शेतकऱ्यावर संकट आले. त्यांच्या मालास योग्य भाव मिळाला नाही. त्यांना जागतिक बाजारपेठ हवी असेल तर ती मिळऊन देण्याचे काम करणारी योजना आता अपेक्षित आहे. केवळ वरचेवर योजना राबविणे योग्य नाही. भारतीयांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. असा मुख्य व्यवसाय कोलमोडला तर मोठे आर्थिक संकट उभा राहाण्याची शक्यता आहे. वास्तकिव राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याच्या खात्यात पंचवीस-पन्नास हजार रूपये टाकले असते तर काही बिघडले नसते. त्यामुळे शेतकऱ्यावर नैसर्गिक व अन्य संकट कोसळले तर मदतीसाठी एक विभाग कार्यरत असावा. तो तातडीने अभ्यास करून आर्थिक मदत देऊ शकेल. पुन्हा शेतकरी तातडीने उभारी घेऊ शकेल अशा भक्कम आधारासाठी एक विभाग निर्माण करणे अपेक्षित आहे. त्याच प्रमाणे आता प्रगत विज्ञानाच्या काळात अंदाज नको तर भक्कम अशा संकटाची पुर्व सुचना देणारी यंत्रणेची गरज आहे. या बाबत तातडीने पाऊल उचलण्याची गरज आहे. संकट येणार आहेतच त्यावर कशाप्रकारे मात करता येईल व शेतकरी पुन्हा कशाप्रकारे भक्कत उभा राहण्यायोग्य करता येईल याचा विचार केला पाहिजे.

# या टिप्स फॉलो केल्यास घरातून पळून जातील झुरळे

काही लोकांना झुरळांकडे पाहून विंचू अंगावर रेंगाळल्यासारखे वाटते. अनेकांनाझुरळांची भीती वाटते. ते सकाळी कुठेही लपले तरी रात्रीच्या वेळी ते सर्व खोल्या, स्वयंपाकघर, शयनकक्ष आणि स्नानगृहे ताब्यात घेतात. ते घरी रिकामे बसले आहेत असे नाही. ते घरात फिरतात आणि जीवाणू पसरवतात. ते स्वयंपाकाची भांडी, भाज्या आणि फळांवर फिरून ई-कोलाय आणि साल्म ोनेला सारखे जीवाणू पसरवतात. यामुळे आरोग्याच्या अनेक सम स्या निर्माण होतात. झुरळांच्या प्रादुर्भावापासून सुटका करण्यासाठी अनेकजण बाजारात उपलब्ध असलेली नाशकं आणून फवारणी करतात. यामध्ये असलेल्या रसायनांमुळे आरोग्याच्या समस्याही उद्भवू शकतात. त्यामुळे घरामध्ये असलेल्या काही घटकांच्या मदतीने तुम्ही झुरळांपासून मुक्ती मिळवू शकता.

लवंग : लवंग हे झुरळांपासून मुक्ती मिळवण्यासाठी उत्तम उपाय असल्याचं सांगितलं जातं. यासाठी कोणत्याही अतिरिक्त प्रयत्नांची आवश्यकता नाही. झुरळं ज्या ठिकाणी फिरतात त्या ठिकाणी लवंगा घालणे पुरेसे आहे.

बेकिंग सोडा : एक चमचा बेकिंग सोडा अर्धा चमचा साखर मिसळून झुरळांच्या घरट्याच्या भेगांमध्ये लावा. ते खाल्ल्याने झुरळे मरतात.

कडुलिंब : कडुलिंब घरातून झुरळ आणि इतर कीटक दूर करण्यासाठी प्रभावीपणे कार्य करते. कडुलिंबाची पाने अशा ठिकाणी ठेवा जेथे झुरळे खूप फिरतात. ही पाने रोज बदला. आपण तीन दिवसात परिणाम पाहू शकता. अन्यथा रात्री झोपण्यापूर्वी ज्या ठिकाणी झुरळं फिरतात त्या ठिकाणी कडुलिंब पावडर किंवा कडुलिंबाचे तेल लावावे. झुरळाची अंडी मारण्यासाठी कडुलिंबाच्या तेलात थोडे गरम पाणी घालून फवारणी करा.

तमालपत्र बिर्याणीचे पान : तमालपत्र गरम पाण्यात उकळा. ते पाणी झुरळे फिरतात तिथे फवारणी करा. झुरळांना हा वास आवडत नाही. त्यामुळे ते घर सोडून जातात.

दालचिनी : दालचिनीला तिखट सुगंध असतो. याने झुरळांना ऍलर्जी होते. दालचिनी पावडर मिठात मिसळा आणि झुरळ ज्या ठिकाणी फिरतात त्या ठिकाणी शिंपडा. हे झुरळे आणि त्यांची अंडी देखील मारते.

वाळलेली काकडी : काकडीचे काप चांगले वाळवा. कपाट आणि कपाटात कोरडे तुकडे ठेवल्यास झुरळांच्या प्रादुर्भावापासून सुटका होऊ शकते. झुरळांना किटकांचा वास आवडत नाही. जर तुम्ही ताजी काकडी सोलून ती झुरळं फिरतात अशा ठिकाणी ठेवली तर त्याचा वास येणार नाही.

# आधुनिक तंत्रज्ञान आणि लहान बालके : समाजशास्त्रीय दृष्टीने बदलतं बालपण

२१व्या शतकात तंत्रज्ञान मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहे. आज जगातील प्रत्येक क्षेत्र, शिक्षण, आरोग्य, उद्योग, संवाद किंवा मनोरंजन तंत्रज्ञानाशिवाय अपूर्ण आहे. विशेष म्हणजे या तांत्रिक क्रांतीचा सर्वात जास्त प्रभाव समाजातील सर्वात नाजूक वयाच्या घटकावर, म्हणजेच लहान बालकांवर पडतो आहे. स्मार्टफोन, टॅबलेट, संगणक, टीव्ही आणि इंटरनेट या साधनांनी लहान मुलांचे जीवन बदलून टाकले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर सांस्कृतिक, सामाजिक आणि भावनिक स्तरावरही खोलवर परिणाम करणारा आहे. समाजशास्त्राच्या परिभाषेनुसार समाज हा मानवी संबंधांचा संघटित समूह आहे, ज्यामध्ये व्यक्ती परस्परसंवाद, मूल्ये, परंपरा आणि नियमांच्या माध्यमातून एकत्र येतात. या समाजाच्या घडणीत बालक ही सर्वात प्राथमिक व मूलभूत घटक असतात. बालक समाजात 'समाजीकरणा'च्या प्रक्रियेद्वारे समाजाचे संस्कार, मूल्ये आणि वर्तन आत्मसात करते. ऑर्गबन आणि निमकॉफ यांनी सांगितले आहे की समाजीकरण म्हणजे व्यक्तीने आपल्या संस्कृतीतील सामाजिक वर्तन, मूल्ये आणि परंपरा शिकण्याची व अंगीकारण्याची प्रक्रिया.



पूर्वी बालकांचे समाजीकरण हे प्रामुख्याने कुटुंब, शाळा, मित्रपरिवार आणि समाजातील परस्पर अनुभवांद्वारे होत असे. परंतु आज तंत्रज्ञान हे या समाजीकरणाचे प्रमुख माध्यम बनले आहे. लहान वयातच बालके मोबाइलवरील व्हिडिओ, कार्टून, गेम्स, शिक्षणासाठी वापरल्या जाणाऱ्या ॲप्स किंवा यूट्यूबवरील सामग्रीद्वारे समाजाशी संपर्क साधत आहेत. अशा प्रकारे, त्यांच्या पहिल्या सामाजिक अनुभवांचे माध्यम म्हणजे 'डिजिटल स्क्रीन' झाले आहे. समाजशास्त्रातील संस्कृती ही संकल्पना येथे महत्त्वाची ठरते. एडवर्ड बी. टेलर यांनी संस्कृतीची परिभाषा देताना म्हटले आहे की, संस्कृती म्हणजे ज्ञान, श्रद्धा, कला, नैतिकता, कायदे, परंपरा आणि इतर सामाजिक सवयींचे एकत्रित स्वरूप. या दृष्टीने पाहता, आधुनिक तंत्रज्ञानाने आजची बालसंस्कृतीच बदलून टाकली आहे. मुलांची गाणी, खेळ, गोष्टी, संवादशैली, अगदी भाषिक अभिव्यक्तीही डिजिटल संस्कृतीच्या प्रभावाखाली आली आहे. 'डोरा द एक्सप्लोरर', 'पॉ पॅट्रोल', 'छोटाभीम' किंवा 'पेप्पा पिग' हानी बनी, यांसारखी पात्रं ही मुलांच्या सांस्कृतिक जगाची नवी प्रतीकं झाली आहेत.

भारतातील शहरी भागातील ५ वर्षांखालील बालकांचा दररोज सरासरी स्क्रीनटाइम सुमारे २.२२ तास असल्याचे एका मेटाविश्र्लेषणात आढळले आहे, जो जागतिक आरोग्य संघटना आणि भारतीय बालरोग तज्ज्ञांच्या शिफारसींपेक्षा दुप्पट आहे. या वयोगटातील मुलांचा मेंदू अत्यंत जलदगतीने विकसित होत असल्यामुळे अशा दीर्घकालीन स्क्रीनटाइमचा त्यांच्या भाषिक, सामाजिक आणि भावनिक विकासावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता असते. अशावेळी तंत्रज्ञानाचा अतिरेक त्यांच्या एकाग्रतेवर, भाषिक कौशल्यावर आणि सामाजिक समजुतीवर दीर्घकालीन परिणाम करतो. लहान वयातच 'डिजिटल व्यसन' निर्माण होण्याची शक्यता वाढते. समाजशास्त्रज्ञ असे म्हणत आहेत की, तंत्रज्ञान हे केवळ साधन नसून ते संस्कृतीवर राज्य करणारी शक्ती बनते. आजच्या बालपणाचे हेच वास्तव आहे. स्क्रीनवरील दृश्ये, जाहिराती, कार्टून किंवा गेम्स बालकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. पूर्वी जे अनुभव प्रत्यक्ष संवादातून मिळत, ते आता आभासी माध्यमातून येतात. परिणामी, बालकांची कल्पनाशक्ती, सहवेदना, भावनिक संवेदनशीलता आणि सामाजिक परस्परसंवाद यावर परिणाम होतो.

समाजशास्त्रातील समाजीकरणाची प्राथमिक संस्था म्हणजे कुटुंब. आई-वडील, आजी-आजोबा यांच्या सहवासातून बालक जीवनमूल्ये शिकते. परंतु आज या सहवासाचा मोठा भाग डिजिटल उपकरणांनी व्यापलेला आहे. बालकांना शांत ठेवण्यासाठी किंवा व्यस्त ठेवण्यासाठी पालकच अनेकदा मोबाइल देतात. यामुळे पालक-बालक नात्यातील संवाद कमी होतो, भावनिक बंध सैलावतात. अनेक अभ्यासांनुसार, दररोज ३-४ तासांहून अधिक स्क्रीनटाइम असलेल्या लहान बालकांमध्ये भाषिक विकासात विलंब होण्याची शक्यता वाढते. उदा. एका संशोधनात असे दिसून आले की ज्या मुलांना दररोज ४ तासांहून जास्त डिजिटल स्क्रीन वापरण्याची सवय होती, त्यांमध्ये भाषिक कौशल्यांच्या विकासात सुमारे ४०% अधिक विलंब आढळला आहे. यावरून असे दिसते की लहान वयोगटातील मुलांना स्क्रीनटाइम नियंत्रित करणे त्यांच्या भाषिक आणि सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

समाजशास्त्रात सांस्कृतिक प्रसार या संकल्पनेनुसार, तंत्रज्ञानाद्वारे संस्कृतींचा प्रसार वेगाने होतो. आज जगभरातील लहान मुले समान डिजिटल सामग्री पाहतात. त्यामुळे 'ग्लोबल चाइल्डहूड' ही संकल्पना उदयाला आली आहे. तथापि, या जागतिक संस्कृतीच्या प्रभावाखाली स्थानिक भाषा, परंपरा, लोककथा आणि खेळ नष्ट होण्याचा धोका आहे. भारतीय बालकांचे पारंपरिक खेळ जसे की गोट्या, लगोरी, फुगडी, भोंडला इ. स्क्रीनवरील 'व्हर्च्युअल गेम्स'नी घेतले आहेत. समाजशास्त्रीय दृष्टीने तंत्रज्ञानाचे सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पैलू आहेत. संरचनात्मक प्रकार्यवादी विचारप्रवाहानुसार समाजातील प्रत्येक घटक समाजाच्या संतुलनासाठी कार्य करतो. तंत्रज्ञानाने बालकांच्या शिक्षणात नवीन दिशा दिली आहे. शैक्षणिक ॲप्स, ऑडिओ-व्हिज्युअल शिक्षण आणि इंटरॅक्टिव्ह गेम्सद्वारे मुलांचा ज्ञानार्जनाचा अनुभव समृद्ध झाला आहे. कोविड काळात डिजिटल शिक्षणाने लाखो बालकांचे शिक्षण थांबू दिले नाही. परंतु दुसरीकडे, संघर्ष सिद्धांतानुसार तंत्रज्ञानाने समाजात विषमता निर्माण केली आहे. श्रीमंत घरातील मुलांकडे उत्तम इंटरनेट, महाग उपकरणे व नियंत्रित वातावरण असते; परंतु गरीब कुटुंबांतील मुलांना असुरक्षित व जाहिरातप्रधान डिजिटल जगाचा सामना करावा लागतो. त्यामुळे डिजिटल विभाजन ही नव्या समाजाची वास्तवता झाली आहे.

तंत्रज्ञानाने सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणेलाही आव्हान दिले आहे. पूर्वी मुलांवर पालकांचे, शिक्षकांचे व समाजाचे नियंत्रण थेट असायचे. आज मात्र मुलांना इंटरनेटद्वारे अशा माहितीचा प्रवेश मिळतो जो त्यांच्या वयानुसार अनुचित असतो. युट्यूब किड्स किंवा गेमिंग प्लॅटफॉर्म्सवरून हिंसक, लैंगिक किंवा जाहिरातप्रधान सामग्री सहज उपलब्ध आहे. परिणामी, बालकांच्या मूल्यसंस्थेवर व नैतिक निर्णयक्षमतेवर प्रश्न्न निर्माण होतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे 'नैतिक दिशाभ्रष्टता' चे लक्षण मानले जाते. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खाइम यांनी म्हटले आहे की, प्रत्येक समाजाने आपल्या सदस्यांमध्ये सामूहिक चेतना टिकवून ठेवली पाहिजे; अन्यथा 'अनोमी' म्हणजेच मूल्यगोंधळ निर्माण होतो. डिजिटल जगातील बालपण हे अशाच मूल्यगोंधळाच्या उंबरठ्यावर उभे आहे. तंत्रज्ञानामुळे बालकांचे ज्ञान वाढत असले तरी सामाजिक संवेदना, संयम, आणि नैतिक समज यावर त्याचा नकारात्मक परिणाम होत आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या (थक्ज, २०१९) मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ५ वर्षांखालील मुलांना दररोज एक तासांपेक्षा जास्त स्क्रीनटाइम देऊ नये. परंतु भारतातील परिस्थिती त्याच्या विपरीत आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरोसाइन्सेस (छखचक-छड, २०२५) च्या अहवालानुसार, शहरी भारतातील ८ ते १० वर्षे वयोगटातील २२% मुलांमध्ये डिजिटल डिपेंडन्स सिंड्रोमची प्रारंभिक लक्षणे दिसून आली आहेत. यावरून स्पष्ट होते की, मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासासाठी स्क्रीनटाइम नियंत्रित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही आकडेवारी समाजासाठी चिंताजनक आहे. समाजशास्त्रीय उपायांच्या दृष्टीने विचार केल्यास, तंत्रज्ञानाचा वापर 'संतुलित समाजीकरणा'साठी करणे आवश्यक आहे. कुटुंब ही समाजाची मूलभूत संस्था आहे; त्यामुळे पालकांनी बालकांसोबत स्क्रीन वेळ नियंत्रित ठेवणे, एकत्रितपणे शैक्षणिक कार्यक्रम पाहणे आणि वास्तविक संवाद वाढवणे गरजेचे आहे. शिक्षणसंस्थांनीही तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणासोबत प्रत्यक्ष खेळ, गटचर्चा, भावनिक शिक्षण आणि कला-क्रियाकलापांना प्राधान्य द्यावे. शासनाने डिजिटल बालसुरक्षा धोरणांची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि बालमैत्रीपूर्ण सामग्रीची निर्मिती प्रोत्साहित करावी.

समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तन ही संकल्पना सांगते की, समाज सतत बदलत असतो आणि हे बदल मूल्यव्यवस्थेला आव्हान देतात. आधुनिक तंत्रज्ञान हा अशाच परिवर्तनाचा वाहक आहे. प्रश्र्न तंत्रज्ञानाचा नाही, तर त्याच्या वापराच्या पद्धतीचा आहे. तंत्रज्ञान बालकांसाठी ज्ञान, सर्जनशीलता आणि संवादाचे शक्तिशाली साधन ठरू शकते, जर त्याचा वापर मूल्याधारित आणि नियंत्रित पद्धतीने झाला तर. लहान बालके ही समाजाची भविष्यदृष्टी आहेत. त्यांचे बालपण केवळ बौद्धिक नाही, तर भावनिक आणि सामाजिकदृष्ट्याही समृद्ध असले पाहिजे. तंत्रज्ञानाच्या युगात ही समृद्धता टिकवण्यासाठी समाजाने 'संस्कार आणि स्क्रीन' यामध्ये संतुलन राखले पाहिजे. कारण संस्कारांशिवाय तंत्रज्ञान हे केवळ यंत्र राहते, पण संस्कारांसह ते संस्कृती बनते.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. - ९९६०१०३५८२

## अजिबात खाऊ नका..., या भाज्यांमुळे होतो मुतखडा

जर तुम्ही किडनी स्टोनच्या समस्येशी लढत असाल तर तुम्ही खाण्यासोबतच पुरेसे पाणी पिण्याची काळजी घ्यावी. रोज खाल्लेल्या काही गोष्टी तुमची प्रकृती बिघडू शकतात. एवढेच नाही, जर तुम्ही या गोष्टींचे जास्त सेवन केले तर तुम्हाला किडनी स्टोन होण्याचा धोकाही वाढतो. या लेखात आपण ऑक्सलेट समृद्ध पदार्थाबद्दल जाणून घेणार आहोत.

किडनी स्टोन ही एक गंभीर आणि वेदनादायक समस्या आहे. दगडांचा आकार लहान किंवा मोठा असू शकतो. जास्त कॅल्शियम, युरिक ऍसिड आणि ऑक्सलेटपासून किडनी स्टोन तयार होतात. जेव्हा हे पदार्थ शरीरातून बाहेर पडू शकत नाहीत तेव्हा ते मूत्रपिंड किंवा मूत्रमार्गात जमा होतात आणि दगडांचे रूप धारण करतात. या लेखात आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की अनेक भाज्यांमध्ये ऑक्सलेट आढळते. या व्यतिरिक्त जर तुम्हाला किडनी स्टोनचा त्रास होत असेल तर तुम्ही या भाज्यांचे सेवन कमी करावे आणि जर तुम्हाला आधीच किडनीच्या सम स्येने त्रास होत असेल तर तुम्ही त्या खाणे टाळावे.

किडनीशी संबंधित महत्त्वाची माहिती

नॅशनल किडनी फाउंडेशन च्या अहवालानुसार, फळे आणि भाज्या, नट आणि बिया, धान्ये, शेंगा आणि अगदी चॉकलेट आणि चहासह अनेक पदार्थामध्ये ऑक्सलेट नैसर्गिकरित्या आढळते.

या भाज्या टाळा

दररोज खाल्ल्या जाणाऱ्या काही भाज्यांमध्ये ऑक्सलेट म ुबलक प्रमाणात आढळते, ज्यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो. कॅल्शियम ऑक्सालेट स्टोन, मुख्य प्रकारचा किडनी स्टोन तयार करणाऱ्या लोकांसाठी या पदार्थाचे सेवन मर्यादित करणे फायदेशीर ठरू शकते. या भाज्यांचा समावेश आहे-

पालक,बीटरूट,हिरव्या पालेभाज्या,रताळे,बटाटा,नेव्ही बीन्स,सोयाबीन.

अधिक प्रमाणात खाल्ल्याने नुकसान

ऑक्सलेट्स कॅल्शियमसारख्या खनिजांचे बंधन कमी करतात. एवढेच नाही तर शरीरात त्याची पातळी वाढल्याने तुमच्या पचनसंस्थेला फायदेशीर पोषक द्रव्ये शोषून घेणे कठीण होते. यामुळे तुमच्या आतड्यांमधील चांगले बॅक्टेरिया कमी होऊ शकतात.

## अजित पाटील कव्हेकर; शहर जिल्हा भाजपाची भटक्या विमुक्त बांधवासोबत दिवाळी साजरी




लातूर/प्रतिनिधी :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकारातून प्रदेश भारतीय जनता पक्षाच्या वतीने एक दिवा वंचीतासाठी हा उपक्रम संपुर्ण राज्यभरात राबविण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शहर जिल्हा भाजपाने लातूर-बार्शी रोडवर असलेल्या पाड्यावर जाऊन भटक्या विमुक्त बांधवासोबत दिवाळी साजरी केली. यानिमित्ताने सदर बांधवाना दिवाळीच्या शुभेच्छा देताना शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी वंचीताच्या विकासासाठी भाजपा सदैव बांधील असल्याचे सांगून त्यांच्या कोणत्याही अडचणीत आम्ही पक्ष म्हणून तुमच्या पाठिशी राहू अशी ग्वाही अजित पाटील कव्हेकर यांनी दिली.

अंत्योदय विकास हेच ध्येय समोर ठेऊन भारतीय जनता पक्षाने आपली वाटचाल सुरु ठेवलेली आहे. सत्ता हे सेवेचे साधन आहे ही संकल्पना प्रत्यक्षात उतरुन केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यासह देशातील शेवटच्या घटकांचा विकास करण्यासाठी अनेक उपक्रम व योजना अंमलात आणल्या जात आहेत. पक्ष म्हणून सुद्धा भारतीय जनता पक्ष शोषित, वंचीत व पिडीताच्या मदतीसाठी तत्परतेने कायम पुढे येत असतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकारातून प्रदेश भाजपने एक दिवा वंचीतांसाठी हा उपक्रम राज्यभर राबविला आहे. या उपक्रमांतर्गत लातूर शहर जिल्हा भाजपाने लातूर-बार्शी रोडवर असलेल्या भटक्या विमुक्तांच्या पाड्यावर जाऊन शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व इतर पदाधिकार्यांनी तेथील बांधवासोबत दिवाळी साजरी केली.

भटक्या विमुक्त कुटूंबियाना दिवाळीनिमित्त भेटवस्तु, फटाके व दिवाळी फराळ भेट म्हणून देण्यात आला. तसेच अजित पाटील कव्हेकर यांच्या सह भाजप पदाधिकार्यांनी या बांधवासोबत दिवाळीचा फराळही केला. यावेळी अजित पाटील कव्हेकर यांनी भारतीय जनता पक्ष अंत्योदय विकास ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेत असल्याचे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शोषित, वंचीत व शेवटच्या घटकांचा विकास करण्यासाठी विविध उपक्रम व योजनांची अंमलबजावणी करून या घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत असल्याचे सांगितले. सत्ता हे सेवेचे साधन असून ही सेवा समाजातील शेवटच्या घटकांसाठी करण्यासाठी आम्ही पक्ष म्हणून बांधील असल्याची ग्वाही यावेळी अजित पाटील कव्हेकर यांनी दिली. तसेच पाड्यावरील बांधवाना कोणतीही आणि कसलीही अडचणी आल्यास पक्ष म्हणून आम्ही सर्वजण आपल्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास यावेळी अजित पाटील कव्हेकर यांनी दिला.

या उपक्रमात शहर जिल्हा सरचिटणीस संजय गिर, निखिल गायकवाड, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, मंडल अध्यक्ष विशाल हवा पाटील, सचिन सुरवसे, राहुल भुतडा, ओबीसी मोर्चा अध्यक्ष प्रमोद गुडे, अनिल पतंगे, देवा गडदे, राजकुमार गोजमगुंडे, उदय देशपांडे, विनय जाकते, राजू सोनवणे, दयानंद जाधव, गोविंद सुर्यवंशी, अस्मिता काटे, संतोष तिवारी, शैलेश आदमाने, धिरज देशपांडे, बाळासाहेब शिंदे, गणेश खाडप आदींसह पक्ष पदाधिकारी व कार्यकत्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.धार्मिक मान्यतेनुसार, कुमारी मुली माता पार्वतींसोबत भगवान शिवाची पूजा करू शकतात, असे म्हटले जाते. खरं तर, अनेक मुली सोळा सोमवार व्रत करतात आणि सोमवार हा भगवान शिवाचा दिवस मानला जातो. असे मानले जाते की भगवान शिवापेक्षा आदर्श पती कोणी नाही, म्हणून अविवाहित स्त्रिया त्यांच्यासारखा पती मिळावा म्हणून सोमवारी उपवास करतात.

# महर्षी जमदग्नी

भारतीय ऋषी : डॉ. अनुराधा कुलकर्णी

'जमदग्नीचा अवतार..' असे म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर एखादी रागीट व्यक्ती उभी राहते, पण ऋग्वेदातील महर्षी जमदग्नींच्याच खालील ऋचेवरून लक्षात येईल की त्यांना नेमका कशाचा राग येत होता. न यः संपृच्छे न पुनः हवीतवे न संवादाय रमते। तस्मात् नः अद्य समृतेः उरुष्यतं बाहुभ्यां न उरुष्यतं ।।ऋ मं८ सू १०१.४ जो मनुष्य कोणत्याही विद्येचा जिज्ञासेने आनंद घेऊ शकत नाही, काहीही शिकण्यात रममाण होऊ शकत नाही, त्यागरूप कर्मरूपी यज्ञात ज्याला रस वाटत नाही, वादसंवादात, चर्चेत ज्याला रुची नसते, अशा माणसापासून परमेश्वराने आम्हाला वाचवावे, अर्थात त्याच्याशी आमचा संपर्क येऊ देऊ नये. अरसिकेषु कवित्वं शिरसी मा लिख मा लिख अर्थात हे देवी, अरसिकापुढे काव्यगायन करण्याचे विधिलिखित आमच्या कपाळी कधी लिहू नकोस गं लिहू नकोस, या प्रसिद्ध सुभाषिताप्रमाणेच महर्षी जमदग्नींची ही ऋचा आहे. ते मोठ्या कळकळीने आपल्याला आवाहन करतात की, माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसा आदित्यानां अमृतस्य नाभिः। प्र नु वोचं चिकितुषे जनाय मा गां अनागी आदितिं वधिष्ट ।।ऋ मं८ सू १०१.१५ सूर्यमंडलातून बाहेर निघणारे तेजःकण हेच रुद्र, देवांचे मातापिता, वसूंच्या कन्या, आदित्याच्या भगिनी व अमृताचे केंद्र होत. अर्थात आपल्याला ज्ञानाची, कार्याची शक्ती देणारे, आपले अवघे जीवन चैतन्यमय करणारे, साधनेचा अमृतानुभव देणारे हे सूर्यनारायणाचे तेज आहे. जाणकार लोकांना जमदग्नी सांगतात की तुम्ही आपल्या जीवनात येणारे हे तेजःकण कधीही नष्ट करू नका. अर्थात रोज उगविणाऱ्या दिवसाचा उन्नतीसाठी योग्य तो उपयोग करून घ्या, आपल्याला मिळणाऱ्या काळाला सत्कारणी लावा.

व्यासंगयुक्त प्रभावी वाणीचे सामर्थ्य महर्षी जमदग्नीं आवर्जून सांगतात. अशा वाणीने लोकसंग्रह होतो, समाजपरिवर्तन होते, राष्ट्राचे उत्थान घडू शकते. ही वाणी शारदेचेच रूप आहे. वचः विदं वाचं उदीरयन्तीं विश्वाभिः धीभिः उपत्तिष्ठमानां। देवीं देवेभ्यः परि ईयुषीं गां आ मा अवृक्तं मर्त्यः दभ्रचेताः।।ऋ मं८ सू१०१.१६ वाचेला



प्रेरणा देणारी, उत्तम प्रज्ञेने वर्णन केली जाणारी, सर्वांना दिव्यत्व प्रदान करणारी, जमदग्नींसारख्या तापसाकडे सदैव येणारी ही वाणीरूप शारदा आहे. पण तिचे माहात्म्य न जाणता अज्ञानी लोक तिला पराङ्मुख होतात. ज्ञानाचा व्यासंग न केल्याने त्यांना प्रभावी बोलता येत नाही. महर्षी जगदग्नींच्या या सुंदर ऋचांवरून लक्षात येते, त्यांची ही तळमळीची इच्छा होती की प्रत्येक माणसाने केवळ उदरभरणार्थ जगू नये, परिसंवादात, नवनवीन ज्ञानसाधनेत रस घ्यावा, रोज उगविणाऱ्या दिनकराच्या तेजाकडून ओजस्वी जीवनाची प्रेरणा घ्यावी, आपण मिळविलेल्या विद्येचा वाणीद्वारे प्रसार करावा, म्हणजेच ज्ञानानंद एकट्यानेच न घेता तो प्रसादासारखा सर्वांना वाटावा, कोणाच्या जीवनाला सुंदर वळण मिळेल, असा वाणीचा उपयोग करावा. कृतिशील आयुष्य जगावे तरच परमेश्वराने दिलेल्या या अनमोल मनुष्यदेहाचे सार्थक होईल. वैवस्वत मन्वंतरातील सप्तर्षींपैकी जमदग्नी एक ऋषी होत. जमदग्नी व विश्वामित्र यांचा जन्म कसा झाला, हे आपण मागील लेखात पाहिले. ऋचिकऋषींनी अभिमंत्रित केलेल्या यज्ञचरूंची अदलाबदल झाल्याने ब्रह्मतेजाने युक्त असे विश्वामित्र क्षत्रियवंशात जन्मले तर क्षात्रतेजाने युक्त असे जमदग्नी ब्राह्मणवंशात म्हणजे तपस्वी ऋचिकऋषी व सत्यवती यांच्या पोटी जन्मले. जमदग्नी हे जन्मतः धगधगत्या अग्नीसारखे होते. त्यांच्याजवळ जन्मजात विद्या होती. त्यांचे जमदग्नी हे नाव सार्थ होते कारण अग्नीतील तेज, प्रकाश व प्रखरता हे तिन्ही गुण त्यांच्यात होते. (पूर्वार्ध)

## जय आणि विजय

एक होता अजय अन् दुसरा होता विजय दोघे होते फारच उनाड कुणावरही पडायची त्यांची धाड दिसला कुणी कर टवाळी आला कुणी मार टपली कुणाच्या दप्तरातले पुस्तक लपव कुणाचा डबा अलगद पळव! शेवटच्या बाकावर दोघे बसायचे. चित्र विचित्र आवाज काढायचे वर्गात कधी विमान उडव बेंच उगाच जोरात बडव सगळे झाले त्रस्त त्रस्त सरांची वाढली वर्गावर गस्त पण दोघेही काही ऐकना उच्छाद त्यांचा थांबेना

मग मुलांची भरली एक मिटिंग पण त्यातच झाली मोठी चिटिंग अजयच झाला मिटिंगचा मुख्य हेच होते मोठे दुःख त्याने केला विजयचा सत्कार विजयने काढले भाषणातून फुत्कार म्हणाला आम्हीच आहोत इथले दादा तुम्ही आमचे गुलाम सदा आमच्या बाजूने या रे सारे नाहीतर व्हाल बळीचे बकरे सगळीच मुले खूप घाबरली भीतीने आपली गप्पच बसली सुरूच राहिला दोघांचा दंगा कोणच घेईना त्यांच्याशी पंगा दिवसा मागून दिवस गेले दिवस महिने वर्ष सरले मग एक दिवस असा उजाडला. अजय विजयला धडा मिळाला शाळेत एकदा जादूगार आला अजय विजयला जोर चढला पळवली त्यांनी जादूची काठी जादुगाराची झाली अडचण मोठी त्याला आला खूपच राग गरगर त्याने फिरवला हात ज्यांनी चोरली माझी काठी डोक्यावरचे केस त्यांचे गळतील मग काय एकदम नवलच घडले अजय विजय टकले बनले खो खो हसली मुले सारी अजय विजयची चांगलीच जिरली तेवढ्यात शाळेची घंटा वाजली जादूगार निघाला आपल्या घरी अजय विजयला फुटला घाम विनवणी केली जादूगरा थांब चुकलो आम्ही पळवली काठी आपली गैरसोय झाली मोठी आता सगळी मुलं गोळा झाली टकल्यांना बघून झाली हळवी मुले म्हणाली अरे जादूगरा अजय विजयला माफ करा. दोघेही आहेत मित्र आमचे देऊन टाक केस पूर्वीचे ऐकून मागणी साऱ्या मुलांची जादूगाराच्या डोळ्यांत आले पाणी तो म्हणाला अजय विजय बघा या मुलांचा मोठेपणा तुम्ही सगळ्यांचा छळ करता केवढा साऱ्यांना त्रास देतातरीही ते विनंती अजय विजयचे केस द्या करतात ऐकून जादूगाराचे खडे बोल दोघांना समजले मित्रांचे मोल दोघेही म्हणाले माफ करा मित्रांनो खरेच आम्ही खूप चुकलो यापुढे कुणाला नाही छळणार सगळ्यांशी आम्ही प्रेमाने वागणार मग जादूगाराने फिरवला हवेत हात छू मंतर जादू मंतर तोंडाने बोलत मग काय सांगू, नवलच घडले अजय विजयचे केस परत आले सगळ्यांना मोठा आनंद झाला मित्रांचा मेळा हसत हसत घरी गेला!

## युद्धविरामापूर्वी जवळपास गाझावासीयांना ६०० दिवस

गेल्या दोन दिवसांपासून गाझा पट्टी येथील इस्त्रायली सैनिकांनी तीव्र हल्ले तर केले असून युद्धविराम झाल्यानंतर जे शांततेचे वातावरण निर्माण झाले होते ते आता पार उद्धस्त झाले आहे. युद्धविरामापूर्वी जवळपास गाझावासीयांना ६०० दिवस बॉम्बहल्ल्यांचा सामना करावा लागला होता. गाझामधील ४६,००० अधिक लोक मारले गेले आहे. त्या हिंसाचाराची पुन्हा आठवण ताजी व्हावी अशीच परिस्थिती सध्या गाझा पट्टीत आणि तेथील रफा परिसरात आहे. मारलेल्या लोकांपैकी १८,००० मुले आहेत. यावरून गाझामधील परिस्थिती किती भीषण आहे हे लक्षात यावे. अर्थात यास दोन्ही बाजू दोषी आहेत हे विसरून चालणार नाही.

# गाझा पट्टी पुन्हा अशांत



कारण एकीकडे हमास युद्धबंदी स्वीकारते पण तिचे पालन करत नाही आणि दुसरीकडे इस्रायली सैन्य तर याचीच वाट पाहत असते, की कधी युद्धबंदी मोडता येईल. यात मानवतेचा मात्र मुडदा पडतो. गाझामध्ये शांतता करार अमलात आणायचा असेल तर तो पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने अमलात आला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. आताची युद्धबंदी ही तात्पुरती आणि वरवरची होती. त्यातून खऱ्या अर्थाने शांतता प्रस्खापित झाली नाही. कायमची शांतता प्रस्थापित झाली तरच युद्धबंदीला काही अर्थ राहील. पण तसे होत नाही हे तर दुःख आहे. याला इस्त्रायल जितके दोषी आहे तितकेच हमासही आहे.

पॅलेस्टाईनचा गाझा भूमीवरील कब्जा हा अवैध असल्याने हा संघर्ष संपू शकत नाही असा पॅलेस्टाईनच्या पक्षपाती लोकांचा दावा असतो. पण ते हमासच्या अतिरेकी कारवायांकडे हेतूतः दुर्लक्ष करतात. हमास आणि इस्त्रायलने एकमेकांवर कराराचा भंग केल्याचा आरोप केला आहे, तर आपल्याला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळावे म्हणून जो अट्टहास केला त्या ट्रम्प यांनी अजूनही गाझामध्ये युद्धबंदी कायम आहे असे म्हटले आहे. पण असे म्हणणे म्हणजे आत्मवंचना ठरेल. इस्त्रायली सैनिकांनी केलेल्या गोळीबारात ४ लोक ठार झाल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या युद्धबंदी करारानंतर हा या भागातील संघर्षाचा सर्वात वाईट दिवस आहे असे जे म्हटले गेले ते अगदी रास्त आहे. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी इजिप्तमधील शर्म एल शेखमध्ये जागतिक नेत्यांसमोर बोलताना मध्यपूर्वेतील शांतता प्रस्थापित केली आहे असा दावा केला होता. पण त्या दव्याची शाई वाळतही नाही तोच इस्रायल आणि हमास यांच्यातील रक्तरंजित संघर्षात प्राणहानी झाल्याने युद्धबंदी मोडीत निघाल्याची बातमी ट्रम्प यांची विश्वासार्हता संपल्याची जाणीव करून देते. इस्त्रायली युद्धविमाने पुन्हा सक्रिय झाली आहेत आणि भविष्यात पुढे आणखी काय वाढून ठेवले आहे याची प्रचिती येते. हमासने अद्याप शस्त्रे हाती घेतलेली नाहीत तरीही अमेरिकेने युद्धबंदी कायम राहण्यासाठी या प्रांतात पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. कारण अमेरिका जेव्हा दुसऱ्या महायुद्धात उतरली तेव्हाच युद्धाचा निकाल लागला होता. त्यामुळे आता ट्रम्प यांना केवळ युद्धबंदी कायम आहे असे म्हणून आपली जबाबदारी झटकता येणार नाही, युद्धबंदीचे उल्लंघन कुणी केले हा वादाचा प्रश्न आहे.

कारण इस्त्रायली सैन्याने हमासने अगोदर युद्धबंदीचा भंग केल्याचा आरोप केला तर इस्त्रायली सैन्याने केवळ हमासच्या हल्ल्यांना उत्तर दिले असे म्हटले आहे. त्यामुळे या वादात न जाता आता शक्तिशाली लोकांनी यातून मार्ग काढावा आणि लोकांना शांततेच्या मार्गाने जाण्यास मदत करावी असाच सर्वसामान्य लोकांचा आग्रह आहे. हमास आणि इस्त्रायली सैनिक यातील कोण खोटे बोलत आहे हे सांगणे अवघड आहे. युद्धबंदीचे उल्लंघन झाले हे उघड आहे आणि ते कुणाच्या आगळीकीने झाले हे या क्षणी बाजूला ठेवले तरीही गाझामध्ये आजची वेळ अत्यंत चिंताजनक आहे हे निश्चित आहे. हमासने इस्त्रायलवर युद्धबंदी भंग केल्याचा आरोप करणे आणि इस्त्रायलने तसाच आरोप करणे यातून काहीही प्रश्न सुटणार नाही. गाझामधील निरपराध लोक मात्र मारले जात राहतील आणि त्यांना न्याय देणारा कुणी नसेल. कोणताही धर्म यात माघार घेण्यास तयार नाही. गप्पा मात्र सारे मानवतेच्या मारतात. पण मानवतेचा सर्वात जास्त मुडडा याच भूमीवर पडला आहे. हा इतिहास आहे.

त्यामुळे इस्त्रायल आणि पॅलेस्टिनी यांच्यातील या युद्धबंदीला अगोदरच ताण बसला होता. जराही हिंसक घटनेनंतर ती युद्धबंदी कोसळली आणि तीच आज शक्यता दिसत आहे. आता तर इस्त्रायलने गाझामध्ये मदत पाठवणे बंद केले आहे. दोन वर्षांच्या विनाशकारी संघर्षांनंतर ट्रम्प यांच्या मध्यस्थीने शांतता प्रस्थापित झाली आणि हिंसाचार आटोक्यात आला होता, पण आता पुन्हा ते दिवस आता परतले आहेत. या पूर्वीही हमास आणि इस्त्रयायल यांच्यात युद्धबंदी लागू झाली होती. पण ती अनेकदा तुटली तसेच यंदाही झाले. कारण अत्यंत घाईघाईने प्रश्नाचा साकल्याने विचार न करता ती अमलात आणली गेली, त्यामुळे युद्धबंदी तुटणारच होती. तसेच झाले आहे. युद्धविराम पार पाडण्यासाठी ट्रम्प यांच्याकडे दृढनिश्चय आहे का हा मूळ प्रश्न आहे. वाटाघाटी गंभीरपणे करण्याची अमेरिकेची म्हणजे ट्रम्प यांची खरोखर इच्छा आहे का हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्धबंदी यशस्वी होत नाही किंवा झाली नाही याला कारण आहे कारण ट्रम्प यांचे सर्व काही आपल्यालाच माहीत आहे असे वाटणारे धोरण. त्यांच्या दिखाऊपणाचे परिणाम दोन्ही बाजूंना भोगावे लागत आहेत हे वास्तव आहे.

इस्त्रायली नेतृत्व आणि हमासचे नेते यांच्याकडे वचनबद्धता असली तरीही त्यांच्याकडे असे काही स्पॉयलर गट आहेत की जे दृष्टिपथात असलेली शांतता प्रत्यक्षात येऊ देत नाहीत. आता ट्रम्प यांनी शांतता करार अमलात आणल्याबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेतली असली तरीही मध्य पूर्वेत किंवा पश्चिम आशियात ट्रम्प यांचा प्रभाव पूर्वीसारखा राहिला नाही हेच वास्तविक कारण आहे. त्यामुळे शांतता करार होतील आणि ते काही काळ चालून मोडले जातील. सध्या गाझाची जनता मात्र वाऱ्यावर आहे आणि तिला वालीही कुणी उरलेला नाही हे सत्य आहे.

## पौष्टिक खा, फिट राहा! — डॉक्टर टीप्स

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...



स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.

(**क्रमशः**)

## विनोद

सेक्सी ड्रेस घालन्यावर दंड लागणार, तर सेक्सी अदांवरही लागायला पाहिजे !



राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?
राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?
Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..
Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?
Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha….

## सुविचार



शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
– कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयुः
सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः।
रस्याः ास्निग्धाः ास्थिरा हृद्या आहााराः साात्विकप्रिया : ।।

अर्थ – जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### संघ पात्र, बांगलादेश वर्ल्डकपमधून बाहेर

दिल्ली-महिला विश्वचषक २०२५ चा २१ वा सामना बांगलादेश आणि श्रीलंका यांच्यात खेळवण्यात आला. या सामन्यात श्रीलंकेने बांगलादेशचा ७ धावांनी पराभव केला. एकवेळ अशी होती, तेव्हा बांगलादेशला १२ चेंडूत १२ धावांची गरज होती. मात्र फक्त ९ चेंडूत सामना पूर्णपणे बदलून गेला. ४९ व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर बांगलादेशची पाचवी विकेट पडली आणि बांगलादेश संघाची एकूण धावसंख्या १९३ धावांवर पोहोचली. त्यानंतर बांगलादेशच्या विकेट्स पडत राहिल्या आणि ५० व्या षटकाच्या चौथ्या चेंडूपर्यंत बांगलादेशने १९४ धावांवर ९ विकेट्स गमावल्या. यासह श्रीलंकेने हा सामना फक्त ७ धावांनी जिंकला. बांगलादेश या पराभवासह विश्वचषकातून बाहेर पडला आहे. श्रीलंकेच्या बांगलादेशविरुद्धच्या विजयानंतर विश्वचषकाच्या गुणतालिकेत बदल झाला आहे. विश्वचषकाच्या सेमीफायनलसाठी आतापर्यंत ३ संघ क्वालिफाय झाले आहेत. तर चौथ्या जागेसाठी अद्यापही ४ संघामध्ये चुरस रंगली आहे. भारताला उपांत्य फेरी गाठायची असल्यास पुढील न्यूझीलंड आणि बांगलादेशविरुद्धचे सामना काहीही करुन जिंकावे लागतील.

***

### एकाच रंगाचे कपडे घालून हार्दिक पंड्या-माहिका शर्माचे ट्विनिंग



दिल्ली-क्रिकेटपटू हार्दिक पंड्या सध्या त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. घटस्फोटानंतर वर्षभराने हार्दिक पंड्याने डेटिंग लाइफबद्दल अपडेट शेअर केली आहे. हार्दिक पंड्या मॉडेल मालिका शर्माच्या प्रेमात आहे. हार्दिकने त्याच्या वाढदिवशी माहिकाबरोबरचे फोटो पोस्ट केले होते. त्यानंतर आता माहिका व हार्दिक यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. हार्दिक पंड्या व माहिका शर्मा ट्विनिंग करून एकत्र बाहेर पडले होते. त्यांचा व्हिडीओ पापाराझींनी शेअर केला आहे. व्हिडीओत माहिकाने बांधणी प्रिंटचा गडद लाल रंगाचा ड्रेस घातला आहे. तर हार्दिकने त्याच रंगाचा कुर्ता घातला आहे. दोघांनीही केलेल्या या ट्विनिंगने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

**

### ऋषभ पंतच्या गळ्यात कॅप्टन्सीची जबाबदारी

मुंबई,-टीम इंडियाच्या मेन्स निवड समितीने दक्षिण आफ्रिका 'ए' विरुद्ध होणाऱ्या दोन ४ दिवसीय सामन्यांसाठी भारत 'ए' टीमची निवड केली आहे. हे दोन्ही सामने बंगळूरु येथील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये खेळवले जाणार आहेत. अशातच आता ऋषभ पंत याचं पुनरागमन झालं आहे.

ऋषभ पंतचं कॅप्टन म्हणून क्रिकेटमध्ये पुनरागमन

बीसीसीआयने आयोजित केलेल्या सामन्यांद्वारे विकेटकीपर- लंदाज ऋषभ पंत कॅप्टन म्हणून स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन करणार आहे. तो जुलैमध्ये इंग्लंड दौऱ्यात झालेल्या दुखापतीतून बरा झाला आहे. विशेष म्हणजे, दुसऱ्या ४-दिवसीय सामन्यासाठी असलेल्या टीममध्ये केएल राहुल, प्रसिद्ध कृष्णा आणि मोहम्मद सिराज यांसारख्या वरिष्ठ प्लेअर्सचा समावेश आहे.पहिल्या मॅचसाठी इंडिया ए संघाचा स्कॉड - ऋषभ पंत (कॅप्टन), आयुष म्हात्रे, एन जगदीसन (विकेटकीपर), साई सुदर्शन (व्हाईस कॅप्टन), देवदत्त पडिक्कल, रजत पाटीदार, हर्ष दुबे, तनुष कोटियन, मानव सुथार, अंशुल कंबोज, यश ठाकूर, आयुष बडोनी आणि सरांश जैन.

***

### आशिया कपची ट्रॉफी भारताला द्या, बीसीसीआयचा मोहसीन नक्वीला इशारा

नवी दिल्ली-भारताने आशिया कपच्या फायनलमध्ये पाकिस्तानला पराभूत करत स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होते. मात्र, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वातील टीम इंडियाने पीसीबी अध्यक्ष आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे ध्यक्ष मोहसीन नक्वीच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता. यानंतर मोहसीन नक्वी ट्रॉफी घेऊन दुबईच्या हॉटेलमध्ये घेऊन गेले होते. त्यानंतर पाकिस्तानला जाण्यापूर्वी नक्वी यांनी ती ट्रॉफी आशियाई क्रिकेट परिषदेच्या कार्यालयात ठेवली आहे. मात्र, ते भारताला ट्रॉफी सोपवण्यास तयार नाहीत. मोहसीन नक्वी यांनी सूर्यकुमार यादवनं एसीसीच्या ऑफिसमध्ये येऊन ट्रॉफी घेऊन जावे असे म्हटले.बीसीसीआयने एसीसी अध्यक्ष मोहसीन नक्वी यांना एक अधिकृत ई-मेल पाठवून विजेत्या संघाला ट्रॉफी लवकरात लवकर सोपवावी असे म्हटले. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी इंडिया टुडे सोबत बोलताना ही माहिती दिली. ते म्हणाले, आम्ही एसीसीला पत्र लिहिलं आहे आणि ट्रॉफी विजेत्या संघाला दिली जावी, असे म्हटलंय.

## केशव महाराजाचा रावळपिंडीत ऐतिहासिक विक्रम!




### पाकिस्तानविरुद्ध ७ बळी घेऊन रचला इतिहास

**१०२ धावांत ७ बळी (७/१०२)**

**पाकिस्तानचे शेवटचे ५ बळी घेतले आणि संघाला ३३३ धावांवर गुंडाळले**

**रावळपिंडी:** दक्षिण आफ्रिकेचा डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराज याने रावळपिंडी येथे पाकिस्तानविरुद्ध सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात शानदार प्रदर्शन करत मोठा इतिहास रचला आहे. त्याने पाकिस्तानच्या पहिल्या डावात केवळ १०२ धावांत ७ बळी (७/१०२) घेत एक जबरदस्त विक्रम आपल्या नावावर केला आहे.

**ऐतिहासिक स्पेल**

कसोटी क्रिकेटमध्ये पाकिस्तानी भूमीवर दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजाने केलेली ही सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली आहे. यापूर्वीचा विक्रम २००३ मध्ये पॉल डम्सने लाह-ोर कसोटीत (७/१२८) केला होता, जो महाराजांनी मोडला.

**दुसऱ्या दिवशी वर्चस्व**

पाकिस्तानने कालच्या (दिवस १) ५ बाद २५९ धावांवरून आज खेळाला सुरुवात केली. सऊद शकील (६६) आणि सलमान अली आगा (४५) यांनी ७० धावांची भागीदारी करून संघाला ३०० धावांच्या पुढे नेले. मात्र, केशव महाराजांनी दुसऱ्या दिवशी सकाळी जबरदस्त गोलंदाजी करत, फक्त १५ धावांच्या बदल्यात पाकिस्तानचे शेवटचे ५ बळी घेतले आणि संघाला ३३३ धावांवर गुंडाळले.

**मोठ्या विकेट्स**

पहिल्या दिवशी त्याने बाबर आझम आणि शान मसूद यांना बाद केले होते. तर, दुसऱ्या दिवशी सलमान अली आगा, सऊद शकील, शाहीन आफ्रिदी, साजिद खान आणि आसिफ आफ्रिदी यांना बाद करून आपला 'सेव्हन-फर' (सात बळी) पूर्ण केला.

**परतफेड:** दुखापतीमुळे पहिला कसोटी सामना न खेळलेल्या महाराजांनी या सामन्यात चमकदार कामगिरी करत जोरदार पुनरागमन केले आहे. महाराजाच्या या जबरदस्त गोलंदाजीमुळे दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानला पहिल्या डावात लवकर गुंडाळण्यात यश मिळवले. तसेच, आशियाई भूमीवर सात बळी घेणारा तो आता जगातील काही निवडक परदेशी फिरकी गोलंदाजांपैकी एक बनला आहे.

## परवेझ रसूलची क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्ती




नवी दिल्ली : जम्मू आणि काश्मीरमधून देशासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारा पहिला क्रिकेटपटू परवेझ रसूलने सर्व प्रकारच्या खेळातून निवृत्ती जा-हीर केली. सातत्यपूर्ण कामगिरी आणि असंख्य कामगिरीने भरलेल्या १७ वर्षांच्या शानदार कारकिर्दीचा हा शेवट आहे. परवेझने २०१४ मध्ये भारतासाठी एकदिवसीय पदार्पण केले आणि २०१७ मध्ये भारतासाठी पहिला टी-२० सामना खेळला.

काश्मीर खोऱ्यातील क्रिकेटपटूंसाठी आशेचा किरण

दक्षिण काश्मीरमधील बिजबेहरा येथील ३६ वर्षीय अष्टपैलू खेळाडू, जो खोऱ्यातील तरुण क्रिकेटपटूंसाठी आशेचा किरण बनला आहे, त्याने भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) ला त्याच्या निर्णयाची माहिती दिली. रसूलने एक एकदिवसीय आणि एक टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. तो पुणे वॉरियर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये देखील खेळला आहे.

प्रतिष्ठित लाला अमरनाथ पुरस्कार

परवेझ रसूलने सांगितले की, जम्मू आणि काश्मीर क्रिकेटच्या विकासाच्या कथेचा भाग असल्याचा मला अभिमान आहे. गेल्या काही वर्षांत, रसूलने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ५६४८ धावा आणि ३५२ विकेट्स घेत अष्टपैलू खेळाडू म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली. देशांतर्गत क्रिकेटमधील त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याला २०१३-१४ आणि २०१७-१८ मध्ये दोनदा रणजी ट्रॉफीमध्ये सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूचा प्रतिष्ठित लाला अमरनाथ पुरस्कार मिळाला. २०१२-१३च्या त्याच्या प्रभावी हंगामात, जिथे त्याने ५९४ धावा आणि ३३ विकेट्स घेतल्या, राष्ट्रीय संघात आणि आयपीएलमध्ये त्याच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. परवेझ रसूलने भारतासाठी एका एकदिवसीय सामन्यात खेळला, दोन विकेट्स घेतल्या. त्याने फलंदाजी केली नाही. त्याने देशासाठी एक टी२० आंतरराष्ट्रीय सामनाही खेळला, एक विकेट घेतली आणि पाच धावा केल्या. त्याने आयपीएलमध्ये ११ सामने खेळले, १७ धावा आणि चार विकेट्स घेतल्या. परवेझने बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय सामना आणि इंग्लंडविरुद्ध टी२० सामना खेळला.

## दिवाळीच्या फोटोमधून पत्नी गायब

### सेहवागच्या कुटुंबातील तणावाच्या चर्चांना पुन्हा उधाण



नवी दिल्ली : भारताचा माजी सलामीवीर आणि प्रसिद्ध क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग पुन्हा एकदा आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. यंदाच्या दिवाळीच्या सणानिमित्त त्याने आपल्या कुटुंबाचा एक फोटो सोशल मीडियावर शेअर करत चाहत्यांना शुभेच्छा दिल्या, मात्र त्या फोटोत त्याची पत्नी आरती न दिसल्याने अनेकांनी प्रश्न विचारायला सुरुवात केली आहे.

सेहवागच्या घरी साजऱ्या झालेल्या दिवाळी सेलिब्रेशनचे हे फोटो असून, त्यात तो आपल्या आई आणि दोन मुलांसोबत - आर्यवीर आणि वेदांत - दिसतो. मात्र पत्नी आरती कुठेही नसल्याने, दोघांच्या नात्यात दुरावा आल्याच्या चर्चांना नवे फोड मिळाले आहे.

हा फोटो पोस्ट होताच सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आणि युजर्सनी कमेंटमध्ये अनेक प्रश्न विच-ारले. तुमची पत्नी कुठे आहे?, घटस्फोट झाला का? अशा थेट विचारलेल्या प्रश्नांनी कमेंट सेक्शन भरून गेला. काहींनी तर, पत्नीशिवाय सण कसा साजरा करता? असे म्हणत नाराजी व्यक्त केली.

मागील काही महिन्यांपासून सेहवाग आणि आरती यांच्या वैवाहिक नात्याबाबत चर्चा सुरू आहेत. काही अफवांनुसार दोघांमध्ये वाद सुरू असून, आरतीचा सेहवागच्या जवळच्या मित्राशी संबंध असल्याचीही चर्चा झाली होती. मात्र या सगळ्यावर सेहवाग किंवा आरती यांच्याकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.से-हवाग आणि आरती यांची ओळख कौटुंबिक नात्यातून झाली होती. दोघं लहानपणा-पासूनच एकमेकांना ओळखत होते. २००४ मध्ये त्यांनी लग्न केलं. हे लग्न नवी दिल्लीतील दिवंगत केंद्रीय मंत्री अरुण जेटली यांच्या निवासस्थानी पार पडलं होतं. त्यांच्या दोन मुलांचा जन्म २००७ आणि २०१० मध्ये झाला.दिवाळीच्या फोटोत आरतीच्या अनुपस्थितीमुळे, त्यांच्या नात्यात खरोखरच काहीतरी बिनसले आहे का, यावर चर्चा पुन्हा जोरात सुरू झाली आहे. मात्र, जोपर्यंत या दोघांकडून अधिकृत खुलासा होत नाही, तोपर्यंत याबाबत खात्रीने काहीही म्हणता येणार नाही

## इंग्लंडचा न्यूझीलंडवर ६५ धावांनी विजय



लंडन : दुसर्या टी-२० सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडचा ६५ धावांनी पराभव करत तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. सोमवारी क्राइस्टचर्चमध्ये प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ४ बाद २३६ धावा केल्या, तर न्यूझीलंडचा संघ १८ षटकांत १७१ धावांवर गारद झाला. इंग्लंडकडून फिल सॉल्टने ५६ चेंडूत ८५ धावा केल्या आणि कर्णधार हॅरी ब्रुकने ३५ चेंडूत ७८ धावा केल्या. लेग-स्पिनर आदिल रशीदने ३२ धावा देत ४ बळी घेतले. मालिकेतील तिसरा टी-२० सामना २३ ऑक्टोबर रोजी ऑकलंडमध्ये खेळला जाईल. पहिला टी-२० सामना पावसामुळे रद्द करण्यात आला.दुसर्या षटकात बटलर बाद

न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून हॅगली षटकात गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दुसर्या षटकात इंग्लंडने यष्टीरक्षक जोस बटलरचा बळी गमावला. त्याला तीन चेंडूत फक्त चार धावा करता आल्या. तिसर्या क्रमांकावर खेळताना जेकब बेथेलने फिल साल्टसह संघाला ५० धावांच्या पुढे नेले. बेथेलने फक्त १२ चेंडूत २४ धावा केल्या.

ब्रुक-साल्ट २००च्या जवळ

चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणार्या कर्णधार हॅरी ब्रूकने फिल साल्टसह संघाला २०० धावांच्या जवळ नेले. ब्रूक ३५ चेंडूत सहा चौकार आणि पाच षटकारांसह ७८ धावा काढून बाद झाला. त्यानंतर लगेचच सॉल्टने ५६ चेंडूत ११ चौकार आणि एका षटकारासह ८५ धावा केल्या. शेवटी, सॅम करनने ३ चेंडूत ८ आणि टॉम बँटनने १२ चेंडूत २९ धावा करून संघाला २३६ धावांपर्यंत पोहा-चवले. न्यूझीलंडकडून काइल जेमीसनने दोन विकेट घेतल्या. जेकब डफी आणि मायकेल ब्रेसवेलने प्रत्येकी एक विकेट घेतली.

न्यूझीलंडची खराब सुरुवात

२३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. त्यांनी फक्त १८ धावांवर दोन विकेट गमावल्या. टिम रॉबिन्सन सात आणि रचिन रवींद्र आठ धावांवर बाद झाले. टिम सेफर्टने मार्क चॅपमनसह संघाला १०० धावांच्या जवळ आणले. चॅपमन २८ आणि सेफर्ट ३९ धावांवर बाद झाले.

नीशम-सँटनरने धावसंख्या १५०च्या पुढे नेली

डॅरिल मिशेल ९ धावांवर आणि मायकल ब्रेसवेल २ धावांवर बाद झाला. संघाने १०४ धावांवर ६ विकेट गमावल्या. तेथून जेम्स नीशमने १७ धावा आणि कर्णधार मिशेल सँटनरने ३६ धावा करून संघाला १५० धावांच्या पुढे नेले. शेवटी, जेकब डफी १ धाव आणि मॅट हेन्री ८ धावांवर बाद झाला. यासह, संघ १७१ धावांवर ऑलआउट झाला.

इंग्लंडकडून लेगस्पिनर आदिल रशीदने ३२ धावांत ४ बळी घेतले. लियाम डॉसनने ३८ धावांत २ बळी घेतले. ब्रायडन कार्स आणि ल्यूक वूड यांनीही प्रत्येकी २ बळी घेतले. हॅरी ब्रूकला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

## वेस्ट इंडीजने बांग्लादेशविरुद्ध सामना खेळताना केला वर्ल्ड रेकॉर्ड!




दिल्ली-बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या वनडे सामन्यात वेस्ट इंडीजने क्रिकेटप्रेमींना आवाक् केले. त्यांनी एकाही वेगवान बॉलर्सचा वापर न करता, केवळ स्पिनर्सच्या जोरावर संपूर्ण ५० ओव्हर टाकल्या. ही वनडे इतिहासातील पहिली घटना आहे. याआधी कोणत्याही टीमने अशी रणनीती अवलंबली नव्हती. या धाडसी निर्णयाचा फायदा त्यांना मिळाला. बांगलादेशला त्यांनी केवळ २१३ धावांवर (७ विकेट्स) रोखले.

संघात ऑलराऊंडर जस्टिन ग्रीव्हेस हा एकमेव वेगवान बॉलर होता पण कर्णधार रोस्टन चेसने त्याला एकही ओव्हर दिली नाही. त्याऐवजी, पार्ट-टाइम फिरकी गेंदबाज ॲलिक अथानाझेला संधी देण्यात आली. अथानाझेने अप्रतिम कामगिरी करत १० ओव्हरमध्ये केवळ १४ धावा देत दोन विकेट्स घेतल्या. डावखुरा फिरकीपटू गुडाकेश मोती सर्वाधिक यशस्वी ठरला, ज्याने १० ओव्हरमध्ये ६५ धावा देत तीन विकेट्स मिळवल्या. अकील होसेन आणि खारी पियरे यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत स्पिन हल्ल्याला मजबूत केले. या पंचकाने बांगलादेशच्या फलंदाजांना खिंडा काढायला भाग पाडले.

स्लो पिचचा खेळ

वेस्ट इंडीज विरुद्ध बांगलादेश हा सामना शेरे बंगला स्टेडियमच्या धीम्या पिचवर खेळला गेला. ही मॅचदेखील पहिल्या वनडेप्रमाणेच ट्विस्ट ॲण्ड टर्नने भरलेली होती. यामुळे फलंदाजांना धावा काढणे कठीण झाले. वेस्ट इंडीजने पहिल्या सामन्यातील धडा घेतला. ज्यात बांगलादेशच्या ऋषद होसेनने अशाच पिचचा फायदा घेत सहा विकेट्स घेतल्या होत्या. वेस्ट इंडीजने त्या पिचेच्या वैशिष्ट्यांचा उपयोग करत रणनीतिक अवलंबली.

वेस्ट इंडिजने बांगलादेशने २०७ धावांचे लक्ष्य दिले होते, पण स्पिनच्या जाळ्यात अडकून ते केवळ २१३ पर्यंत मर्यादित राहिले. ऋषद होसेनने १४ चेंडूत ३९ धावांची झटपट फटकेबाजी करून धावा वाढवल्या, तरीही टीम जिंकण्याच्या स्थितित नव्हती.

जुना रेकॉर्ड तुटला

वनडे क्रिकेटमध्ये स्पिन ओव्हरांच्या बाबतीत श्रीलंका हा मकिंगफ मानला जातो. १९९६ मध्ये पोर्ट ऑफ स्पेन येथे वेस्ट इंडीजविरुद्ध त्यांनी ४४ ओव्हर स्पिन टाकल्या होत्या, ज्यात मुथैया मुरलीधरन, अरविंद डी सिल्वा, कुमार धर्मसेना, उपुल चंदना, सनथ जयसूर्या आणि हशन तिलकरत्ने यांनी सात विकेट्स घेतल्या. श्रीलंकाने ३५ धावांनी विजय मिळवला. नंतर १९९८ मध्ये न्यूझीलंड आणि २००४ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धही त्यांनी अशी रणनीती अवलंबली. वेस्ट इंडीजने हा ४४ ओव्हरांचा विक्रम मोडून ५० च्या पूर्ण संख्येने नवा इतिहास रचला. योग्य परिस्थितीत स्पिनचं धोरण अत्यंत घातक ठरू शकते हे वेस्ट इंडीजने दाखवून दिले. पहिल्या सामन्यातील ७४ धावांच्या पराभवानंतर हा जबरदस्त प्लान आखून प्रत्युत्तर दिले. ज्याने मालिकेत ०-१ च्या मागे असलेल्या त्यांच्या टीमला स्फूर्ती मिळाली. क्रिकेटजगतात या कारनाम्याची प्रशंसा होतेय.

धीम्या पिचेसवर अशी स्टॅटर्जी सामान्य होऊ शकते. हे यश वेस्ट इंडीजच्या फिरकी विभागाला नवीन ओळख देईल आणि इतर संघांना प्रेरणा देईल, असे तज्ञ सांगतात.

# रेणापूरकरांना दिपावली भेट; भाजपा नेते आ. कराड यांच्या प्रयत्नातून विविध रस्ते आणि नाली बांधकामासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर येथील विविध विकास कामासाठी गेल्या आठवड्यात पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. दिपावलीच्या निमित्ताने भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून रेणापुर शहरातील विविध सिमेंट रस्ते आणि नाली बांधकामासाठी आणखी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने भाजपाचे रमेशआप्पा आमदार ! कामगिरी दमदार !! अशीच भावना रेणापूरच्या नागरिकांतून व्यक्त होत आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर नगरपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यापासून राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून घेतला मंजूर निधीतून रेणापूर येथे नवीन पाणीपुरवठा योजना, श्री रेणुका देवी मंदिर भक्तनिवास, अशोक सम्राट बौद्ध विहार, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, बालाजी मंदिर परिसरात भव्य सभागृह, रेणा नदीवर घाट विकसित करणे, श्री रेणुका देवी मंदिर परिसर विकासीत करणे, अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर, रेड्डी समाज भवन, हनुमान मंदिर सभागृह, अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पथदिवे, अंगणवाडी बांधकाम यासह विविध विकास कामे होत आहेत. यातील काही कामे झाली आहेत तर काही कामे प्रगतीपथावर आहेत इतर उर्वरित कामाला येत्या काही दिवसात प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे.

गेल्या १४ ऑक्टोबर रोजी रेणापूर येथे ३ कोटी रुपये खर्चाचे इंनडोअर क्रीडा संकुलन, वाचनालय विकसित करण्यासाठी १ कोटी आणि बालाजी मंदिर येथील सभागृहाच्या उर्वरित बांधकामासाठी १ कोटी रुपये असे एकूण पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. रेणापूर शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढा मोठ्या प्रमाणात आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून निधी प्राप्त झाल्याने सर्वांगीण विकासाला गती मिळाली.

रेणापूर शहरातील अंतर्गत रस्ते आणि नाली बांधकामासाठी निधी मिळावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि राज्याचे नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला, केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्याच्या नियोजन विभागाने नागरी सेवा व सुविधा करिता सहाय्यक अनुदान योजनेतून २० ऑक्टोबर २५ रोजीच्या शासन निर्णय पत्रकांन्वये तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी मंजूरी झाला आहे. त्यात प्रभाग ११ मध्ये ६० लक्ष, प्रभाग १६ मध्ये १ कोटी ५० लक्ष, प्रभाग १२ मध्ये ७० लक्ष, प्रभाग १ मध्ये २० लक्ष, प्रभाग १३ मध्ये ४० लक्ष, प्रभाग १४ मध्ये ३० लक्ष, प्रभाग १० मध्ये ५० लक्ष, प्रभाग २ मध्ये ५० लक्ष, आणि प्रभाग १५ मध्ये ३० लक्ष असे एकूण पाच कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे.

रेणापूर शहराच्या विकास कामासाठी गेल्या आठवड्यात पाच आणि आणखी पाच असे एकूण दहा कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, भाजपाचे चंद्रकांत कातळे, सुधीर तोडकरी, श्रीकृष्ण मोटेगावकर, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, दिनकर राठोड, विजय चव्हाण, गणेश चव्हाण, शेख अजीम, दिलीप आकनगिरे, उत्तम चव्हाण, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, महेश गाडे, अंतराम चव्हाण, मारूफ आत्तार, उत्तम घोडके, रमा चव्हाण, लखन आवळे, हनुमंत अकनगिरे, धम्मानंद घोडके, संतोष राठोड, अंकुश मोटेगावकर, दिलीप चव्हाण, सोपान सातपुते, संजय वीरुळे, हनुमंत भालेराव, अमृतेश्र्वर स्वामी, महेश वरवटे, हरी भोळे, नंदकुमार बड़े, शेख सलीम, शेख मकसूद, रफिक शिकलकर, शरद चक्रे, हरी पांचाळ, मनोज चक्रे, सुभाष राठोड, सचिन शिरसकर, सुरज फुलारी, दत्ता कातळे, महेश मदने, लक्ष्मण दळवी, शिवाजी भावे, विकी राजे, ज्ञानोबा सातपुते, आवेश कुरेशी, शेषराव पवार, परमेश्र्वर राठोड, समीर माने, गणेश भोकरे, अर्जुन सूर्यवंशी, रोहित खुमसे, पप्पू कुडके यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या चालवणार

**सोलापूर/प्रतिनिधी** : रेल्वेने सोलापूर आणि अनकापल्ली दरम्यान साप्ताहिक विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

सोलापूर-अनकापल्ली साप्ताहिक विशेष गाड्या (१२ फेऱ्या)

– ०१४७७ साप्ताहिक विशेष गाड्या २४.१०.२०२५ ते २८.११.२०२५ पर्यंत दर शुक्रवारी सोलापूरहून सकाळी ०९:३० वाजता निघतील आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १:०० वाजता अनकापल्ली ला पोहोचतील. (६ फेऱ्या)

– ०१४७८ साप्ताहिक विशेष गाड्या २५.१०.२०२५ ते २९.११.२०२५ पर्यंत दर शनिवारी सायंकाळी ०५:३५ वाजता अनकापल्ली हून निघतील आणि दुसऱ्या दिवशी रात्री ११:५० वाजता सोलापूरला पोहोचतील. (६ फेऱ्या)

थांबे: अक्कलकोट रोड, दुधनी, गाणगापुर, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अदोनी, गुंतकल, अनंतपूर, धर्मवरम, कदिरी, मदनपल्ली रोड, पीलेर, पाकाला, तिरूपति, रेणिगुंटा, श्री कालहस्ती, गुडूर, नेल्लूर, ओंगोल, चीराला, तेनाली, विजयवाड़ा, एलुरु, ताडेपल्लीगुडेम, निडदवोलु, राजमंड्री, सामलकोट, अन्नवरम और एलमंचिली.

रचना: १ AC-II टियर, १ -AC-III टियर, ११ स्लीपर क्लास, ५ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन. (२० कोच)

आरक्षण आणि बुकिंग: विशेष गाड्या ०१४७७ साठी विशेष शुल्कासह आरक्षण २२.१०.२०२५ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर सुरू होईल.

अनारक्षित कोचसाठी बुकिंग स्थानकांवरील बुकिंग काउंटर आणि UTS अॅपद्वारे देखील करता येते.

# यंदाच्या गळीत हंगामात अतिवृष्टीने शेतकरी अडचणीत उसाचे गाळप वेळेत आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्याचे माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्याकडून निर्देश

### विलास कारखाना संचालक मंडळाची बैठक संपन्न

**लातूर/प्रतिनिधी** : यंदाच्या गळीत हंगामात अतिवृष्टीने शेतकरी अडचणीत आहे, अडचणीतील शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप वेळेत आणि कार्यक्षमतेने पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले असून साखर कारखान्यांच्या बैठकीत बोलताना त्यांनी यांत्रिकीकरणातून १० हजार तरुणांना रोजगार मिळत असल्याचेही स्पष्ट केले.

माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता लातूर तालुक्यातील निवळी येथील विलास सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाची बैठक संपन्न झाली. त्यानंतर लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच विलास सहकारी साखर कारखान्याच्या वतीने १५ हार्वेस्टर व ३० इनफिल्डर खरेदी करण्यात आले आहेत, त्याचे पूजन चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या हस्ते व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी व्हाईस चेअरमन, माजी आमदार वैजनाथराव शिंदे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, संचालक सर्वश्री रविंद्र काळे, अमृत जाधव, सतिष शिंदे (पाटील), अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले,



गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके (देशमुख), रामराव साळुंके, दिपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, माजी संचालक सर्वश्री गोविंद बोराडे, भैरवनाथ सवासे, राजेंद्र मस्के, रामचंद्र सुडे, उमेश बेद्रे, चंद्रकांत टेकाळे, जयचंद भिसे, अनिल पाटील, नारायण पाटील, भारत आदमाने, बाळासाहेब बिडवे, आदीसह कारखान्याच्या संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक, सभासद उपस्थित होते.

**गाळप नियोजनाच्या केल्या सूचना**

यावेळी बोलतांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, यावर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी वर्ग अडचणीत आहे, त्यामुळे या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची काळजी घेऊन, त्यांच्या उसाच्या गाळपाचे नियोजन करावे, या नियोजनाप्रमाणे ऊस तोडीचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळण्यात यावे, अधिकाधिक कार्यक्षमतेने कारखाना चालवून जास्तीत जास्त उसाचे गाळप करावे, अशा सूचना याप्रसंगी दिल्या आहेत.

**यांत्रिकीकरणातून रोजगार निर्मिती**

पूढे बोलतांना ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उसाचे गाळप वेळेत व्हावे यासाठी मांजरा परिवारातील सर्वच साखर कारखान्यांच्या वतीने ऊस तोडणीचे ही यांत्रिकीकरण टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे, या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या १० हजार मुलांना रोजगार उपलब्ध होत असल्याचे याप्रसंगी बोलताना सांगीतले. यावेळी लवकरच सुरू होत असलेल्या गळीत हंगाम पूर्वतयारीचा या बैठकीदरम्यान त्यांनी आढावा घेतला.

### वंचित समाजासोबत उजळली दिवाळी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सेवा भारतीचा उपक्रम हृदयाला स्पर्श करणारा

**धाराशिव/प्रतिनिधी** : दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि उत्साहाचा सण. पण समाजातील काही घटक अजूनही या आनंदापासून दूर आहेत. अशा बांधवांच्या चेहऱ्यावरही दिवाळीचा उजेड फुलवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघच्या सेवाभारती धाराशिव यांच्या वतीने एक हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. शहरातील साठे चौक परिसरातील पारधी पिढी आणि फकिरा नगर येथे स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष जाऊन स्थानिकांसोबत दिवाळी साजरी केली. येथे राहणाऱ्या कुटुंबांना मिठाई सह फराळाचे किट वाटप करण्यात आले, तर ओवाळणीच्या निमित्ताने महिलांना साडी देऊन त्यांच्या आनंदात भर घातली. या उपक्रमादरम्यान स्वयंसेवकांनी बालकांसोबत खेळत, त्यांना गोडधोड देत एक वेगळाच दिवाळीचा अनुभव निर्माण केला. सेवा भारतीच्या या उपक्रमाने समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या सणाच्या आनंदात सामावून घेण्याचा हा प्रयत्न अनेकांच्या मनाला भिडला यावेळी सेवाभारती चे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रसाद धर्म, सचिव डॉ.शतानंद दहिटणकर, डॉ.पंकज शिनगारे ,जिल्हा संघचालक ड. रविंद्र कदम उपस्थित होते.




# पंढरपूर रेल्वे स्थानकावर अमृत संवादाच्या आयोजनाने रेल्वे-नागरिक संवाद बळकट झाला

**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने चालू असलेल्या विशेष मोहीम ५.० चा भाग म्हणून २० ऑक्टोबर २०२५ रोजी पंढरपूर रेल्वे स्थानकावर अमृत संवाद बैठकीचे आयोजन केले.

संवाद, अभिप्राय आणि सहकार्यासाठी थेट व्यासपीठ उपलब्ध करून देऊन रेल्वे अधिकारी आणि रेल्वे वापरकर्त्यांमधील संबंध मजबूत करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती (DRUCC) सदस्य आणि पंढरपूरच्या रेल्वे संघटनेच्या प्रतिनिधींनी बैठकीत सक्रिय सहभाग घेतला आणि प्रवाशांच्या सुविधा आणि सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांच्या मौल्यवान सूचना दिल्या.






अमृत संवादाचे ठळक मुद्दे

अमृत संवाद उपक्रमांतर्गत, खालील बाबींबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली: – पंढरपूर स्टेशन परिसराची स्वच्छता आणि देखभाल. – रेल्वे प्रशासनाने विकसित केलेल्या आधुनिक सुविधा जसे की अपग्रेड केलेले शौचालये, होल्डिंग एरिया, नवीन मोठी ड्रेनेज लाईन, नवीन प्लॅटफॉर्म, फूट ओव्हर ब्रिज (FOB), एस्केलेटर आणि लिफ्ट. – नवीन रेल्वे सेवांसाठी प्रस्ताव, विद्यमान गाड्यांची वारंवारता वाढवणे आणि कॉर्ड लाईन प्रकल्प पूर्ण करणे. – वाढीव सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे. – जनऔषधी स्टॉल्सची स्थापना आणि फूड मॉलसाठी नवीन प्रस्तावित स्वयंपाकघराचा विकास करणे. – नाशवंत वस्तूंच्या वाहतुकीसाठी, शेतकऱ्यांना आणि शेती-आधारित व्यापाराला पाठिंबा देण्यासाठी नवीन किसान रेल्वेची ओळख. – प्रादेशिक कनेक्टिव्हिटी आणि प्रवाशांसाठी सुविधा सुधारण्यासाठी पंढरपूर-देहू मेमू सेवेचा शुभारंभ.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM), डॉ. सुजीत मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली आणि वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक (सिनिअर डिसीएम) श्री योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक सकारात्मक आणि सहयोगी वातावरणात पार पडली, जी पंढरपूर स्थानकावरील प्रवासी सुविधा आणि सेवांमध्ये सतत सुधारणा करण्यासाठी रेल्वे अधिकारी, DRUCC सदस्य आणि भागधारकांच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करते.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागामार्फत नांदेड -हडपसर विशेष गाड्या चालवण्यात येणार

**सोलापूर/प्रतिनिधी** : रेल्वेने नांदेड आणि हडपसर दरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

नांदेड-हडपसर विशेष गाड्या (४ फेऱ्या)

– ०७६०७ साप्ताहिक विशेष गाड्या मंगळवारी २१.१०.२०२५ आणि २८.१०.२०२५ रोजी सकाळी ८:३० वाजता नांदेडहून सुटतील आणि त्याच दिवशी रात्री ९:४० वाजता हडपसरला पोहोचतील. (२ फेऱ्या)



– ०७६०८ साप्ताहिक विशेष गाड्या दर मंगळवारी २१.१०.२०२५ आणि २८.१०.२०२५ रोजी रात्री १०:४० वाजता हडपसरहून सुटतील आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२:१५ वाजता नांदेडला पोहोचतील. (२ फेऱ्या)

थांबा: पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर, लातूर रोड, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी आणि दौंड.

रचना: १ फर्स्ट एसी, २ एसी-II टियर, ६ एसी-III टियर, १ एसी हॉट बुफे कार, ६ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास आणि २ लगेज कम ब्रेक व्हॅन. (२२ कोच)

आरक्षण आणि बुकिंग: सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर विशेष शुल्कावर विशेष गाड्यांचे आरक्षण सुरू होईल.

अनारक्षित कोचचे बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि UTS अॅपद्वारे देखील करता येईल.

या विशेष गाड्यांच्या तपशीलवार वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES अॅप डाउनलोड करा.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# लातूर समाचार

। लातूर । बुधवार, दिनांक २२ ऑक्टोबर २०२५ । पान ६


## पंचायत समिती, निलंगा जि. लातूर

### निलंगा तालुक्यातील सर्व जनतेस

### दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा...

वृक्ष लावा, जीवन वाचवा
जल है, तो कल है
स्वच्छता हा रोजचा सण..
नाही तर कायमचे आजरपण..



**श्री.सतिष गोविंदराव पाटील**
गटविकास अधिकारी
व सर्व अधिकारी, कर्मचारी वृंध, पंचायत समिती, निलंगा

---

पार्श्व मेडिकल ॲन्ड जनरल स्टोअर्स,
अंबाजोगाई रोड, लातूर

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

प्रोप्रा. बेदमुथा
मो. ९९७५३९५७८०
७०३०७४७४४७

---



## शुभ दीपावली

स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला,
सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला.

**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**



**ॲड. किरण जाधव**
शहर जिल्हाध्यक्ष, कॉंग्रेस कमिटी, लातूर.

**अभय साळुंके**
जिल्हाध्यक्ष, कॉंग्रेस कमिटी, लातूर.

---



21 TwentyOne

## शुभ दीपावली

## गोडवा मेहनतीचा, प्रकाश प्रगतीचा!

लातूरचा **२१ शुगर्स** या अत्याधुनिक साखर कारखान्याने फक्त गोड साखर नव्हे, तर हजारो शेतकऱ्यांच्या जीवनात **" स्थैर्य, समृध्दी आणि आनंदाचा गोडवा"** निर्माण केला आहे.

ऊसदर
**रु. ३००१/- टन**
**२०२४-२५**

उद्दिष्ट
**रु. ३१५१/-* टन**
**२०२५-२६**



* नियम व अटी लागू-गळीत हंगाम २०२५-२६ च्या ऊसदर निश्चितीच्या (FRP) नियमास अधिन राहून अंतिम दर

**बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ - २०२५**
गुरुवार, दि. २३ ऑक्टो. २०२५
रोजी सकाळी १० वाजता

**21 ट्वेन्टीवन शुगर्स लि.**
मळवटी, ता.जि. लातूर

---

बँकेच्या सभासद, ग्राहक व हितचिंतकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा....

स्नेह ! सौख्य !! साफल्य !!!

## लक्ष्मी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि; लातूर

LAXMI URBAN CO-OP. BANK LIMITED, LATUR
स्थापना वर्ष-१९९७

मुख्य कार्यालय : १६/७, कव्हा रोड, मार्केट यार्ड, लातूर - ४१३५१२ फोन क्रं : (०२३८२) २५१७५३, २५९७५३
ई-मेल Email : laxmi_urban@lucbank.in वेबसाईट : www.lucbank.in

**: वैशिष्ट्ये :**

१. सर्व सामान्यांच्या जिव्हाळ्याची बँक
२. विविध ठेव योजना व आकर्षक व्याज दर
३. कोअर बँकींग, SMS, ई-मेल स्टेटमेंट सुविधा
४. NEFT/RTGS d NACH सेवा उपलब्ध आहे.
५. Income Tax, GST व इतर टॅक्स भरण्याची सुविधा
६. अटल पेन्शन योजना व प्रधानमंत्री आवास योजना
७. शाखेतून विविध प्रकारचे बील भरण्याची सुविधा
८. सर्व शाखेतून ७/१२, ८ अ, फेरफार ई. सुविधा
९. विमा सेवा

- ३१ मार्च २०२५ अखेरीस ठेवी १६८.७७ कोटी, कर्जवाटप १२०.६४ कोटी
- मागील सतत ४ वर्षापासून बँको ब्लू रिबीन पुरस्कार मिळवणारी बँक
- विविध डिजिटल बँकिंग सुविधा पुरवणारी जिल्ह्यातील सहकारी बँकांमधील पहिली बँक.

**आकर्षक कर्ज योजना**

* वैयक्तिक कर्ज योजना
* वाहन कर्ज योजना
* वेअरहाऊस, माल तारण कर्ज योजना
* गृह कर्ज योजना
* पगार तारण कर्ज योजना
* कॅश क्रेडिट कर्ज योजना
* व्यवसाय कर्ज योजना
* मुदती कर्ज योजना
* प्रोफेशनल कर्ज योजना
* व्यवसाय कर्ज योजना
* मालमत्ता तारण कर्ज
* सोलार पॅनल कर्ज

फ्रँकींग सुविधा उपलब्ध...!

- लक्ष्मी वास्तू संकल्पपूर्ती कर्ज योजना
- Mobile Banking App, UPI, IMPS, QR Code, Rupay ATM Card सुविधा

**बँकेच्या एकूण शाखा**
* मुख्य शाखा, मार्केट यार्ड, लातूर
* छ. शिवाजी म. चौक, मुरुड
* बीड रोड, माजलगाव
* छ. शिवाजी म. चौक, लातूर
* सराफ लाईन, अहमदपूर
* जुना मोंढा, नांदेड
* मार्केट यार्ड, जळकोट
* शिवपुरी रोड, उमरगा

आधार लिंक, DBT द्वारे शासनाच्या सर्व योजनांची सबसिडी / रक्कम खात्यात जमा करून घेण्याची सुविधा असलेली बँक.

-: शुभेच्छूक :-

अशोक श्रीकिशनजी अग्रवाल – चेअरमन
सतिष तात्याराव भोसले – व्हा.चेअरमन
अविनाश भारतराव आळंदकर – प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी

**संचालक मंडळ**

सूर्यप्रकाश मुरलीधरजी धुत
लक्ष्मीकांत मोतीलालजी सोमाणी
अजीतलाल हिरलालजी आळंदकर
शशिकांत जयवंतराव मोरलावार
डॉ.अनिल कांताप्रसादजी राठी
गणेश हनुमानदासजी हेडडा
आशिष अशोकजी अग्रवाल
विशाल बाळकृष्णजी हलवाई
सौ.रचना शिवकांतजी ब्रिजवासी
सौ.कमलादेवी विजयकुमारजी राठी
सौ.माला ओमप्रकाशजी भुतडा
कु. सुवर्णा मारोती पवार

तज्ञ संचालक सी.ए.किशोर बन्सीलालजी भराडिया, सी.ए. राजेश ब्रिजकिशोरजी अग्रवाल

**व्यवस्थापन मंडळ सदस्य**

लक्ष्मीकांत मोतीलालजी सोमाणी - अध्यक्ष
शशिकांत जयवंतराव मोरलावार - सदस्य
सी.ए. राजेश ब्रिजकिशोरजी अग्रवाल - सदस्य
सी.ए. पुरुषोत्तम रामनिवासजी करवा - सदस्य
सी.ए. राधेशाम श्रीरामजी बियाणी - सदस्य
व सर्व स्थानिक सल्लागार, कर्मचारी वर्ग, पिग्मी प्रतिनिधी

---

BAI-KAKAJI GROUP

SUNRICH AQUA

शुद्धतेच्या साथीनं उजळो तुमचं आयुष्य,
सनरीच ॲक्वा कडून
**दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !**




+91 8484964452 www.sunrichaqua.com mail-care@sunrichaqua.com


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६